मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी प्रशासनासंबंधीचे नियम / निकष / अटी / शर्ती विहीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक सीसीएफ-२०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि.१७ सप्टेंबर, २०१९

वाचा: १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीडीसी-१०६९/१३५१४-बी, दि.२७/८/१९६९.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीडीसी-१०६९/१३५१४-बी, दि.८/१०/१९७०.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीसीएफ-२०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५, दि.४.३.२०१७
४) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीसीएफ-२०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५, दि.२७.९.२०१७

प्रस्तावना :

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून संस्थांना देणगी / अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी तयार केलेली नियमावली व त्यास अनुसरून मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी प्रशासनासंबंधीच्या नियमांबाबत दि.२७/८/१९६९, दि.८/१०/१९७०, दि.४/३/२०१७ चे शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रक दि.२७/९/२०१७ अन्वये निकष व तरतूदी ठरवून देण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून संस्थांना देणगी / अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी शासन निर्णय दि.४.३.२०१७ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी प्रशासना संबंधीच्या नियमाबाबत शासन निर्णय दि.२७/८/१९६९, दि.८/१०/१९७०, दि.४/३/२०१७ चे शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रक दि.२७/९/२०१७ अधिक्रमित करून मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीबाबत नियम, निकष व तरतूदीबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीबाबत संदर्भ क्रमांक १ ते ४ येथील शासन निर्णय व शुध्दीपत्रक याद्वारे अधिक्रमित करून मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून अर्थसहाय्याचे वाटप करण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे खालील प्रमाणे सुधारित नियम, निकष, अटी / शर्ती विहीत करण्यात येत आहेत.

१. या निधीला “मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी ” असे म्हणता येईल.

२. मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून अर्थसहाय्याची मागणी केलेले अर्ज मुख्यमंत्री कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर ज्या अर्जावर मा. मुख्यमंत्री महोदय यांचे लेखी आदेश/ शिफारस प्राप्त झाले आहेत, असे अर्ज, पुढील उचित कार्यवाहीसाठी विभागाकडे पाठविण्यात येतील. सदर अर्जावर शासन निर्णयास अनुसरून संबंधित संस्थांकडून सविस्तर प्रस्ताव मागविल्यानंतर मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी समिती समोर सादर करण्यात येतील.

३. (अ) **मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी समिती :-**

मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली “ मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी समिती ” गठीत करण्यात आली आहे. मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून देणगी/अर्थसहाय्य मंजूर करण्याकरिता वरील प्रमाणे प्राप्त होणारे तसेच विभागाकडे प्राप्त होणारे परिपूर्ण प्रस्ताव या समितीसमोर सादर करण्यात येतील. ही समिती, शासन निर्णयातील विहीत निकषांनुसार परिपूर्ण पात्र प्रस्ताव शिफारशीसह मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येतील.

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल.

१.	मा.मुख्य सचिव	--	अध्यक्ष
२.	मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव	--	सदस्य
३.	सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग	--	सदस्य
४.	संबंधित विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव	--	सदस्य
५.	उपसचिव/सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२५)	--	सदस्य सचिव

(ब) निधीचे व्यवस्थापन :-

१) "मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी" मधून मा.मुख्यमंत्री स्वेच्छानिर्णयानुसार, या निधीतील रकमेचा महाराष्ट्र राज्यातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धर्मादाय किंवा तत्सम संस्था किंवा निम सार्वजनिक स्वरुपाच्या संस्था किंवा संघटना यांना अर्थसहाय्य देण्यासाठी उपयोग करु शकतील.

२) या निधीचे संपूर्ण नियंत्रण, व्यवस्थापन व प्रशासन मा. मुख्यमंत्री महोदयांकडे निहीत राहील.

३) या निधीच्या प्रशासनाच्या कामात शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी या निधीचे "नियंत्रक अधिकारी" असतील. निधीच्या बाबतीत करावयाची सर्व कार्यवाही निधीचे एकमेव प्रशासक म्हणून मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि ती एकतर मुख्यमंत्र्यांकडून किंवा मुख्यमंत्र्यांची मान्यता घेतल्यानंतर नियंत्रक अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

४) या निधीचा आर्थिक व्यवहार भारताच्या रिझर्व्ह बँकेतील स्वीय प्रपंजी लेखा खात्याद्वारे नियंत्रक अधिकाऱ्याच्या नावे आहे. नियंत्रक अधिकाऱ्याला या लेख्यासंबंधात आर्थिक व्यवहार करण्याचा हक्क असेल.

५) या निधीतील व्यवहारांचा हिशेब शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र नमुना "अ" व "ब" मध्ये नोंदविण्यात येतील. तसेच सदर नोंदी वेळोवेळी "नियंत्रण अधिकारी" यांच्याकडून प्रमाणित करण्यात येतील.

(क) मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीचे निकष/अटी/शर्ती :-

"मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी " मधून वित्तीय सहाय्य मागणीकरिता धर्मादाय संस्थांना पुढील निकष/ अटी/ शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील. संस्थेने वित्तीय सहाय्यासाठी पुढील दस्ताऐवज / प्रमाणपत्र (पुरावा म्हणून) सादर करणे आवश्यक आहे.

१) अर्जदार धर्मादाय संस्था, "संस्था नोंदणी अधिनियम १८६०" किंवा "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. अर्थसहाय्य मागणी प्रस्तावासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२) अर्जदार धर्मादाय संस्थेला, "संस्था नोंदणी अधिनियम १८६०" किंवा "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" अन्वये नोंदणी केल्यानंतर पाच वर्षे पूर्ण झालेली असावीत आणि ती यथा योग्यरित्या कार्यरत असणे आवश्यक आहे.

३) धर्मादाय संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवड प्रक्रिया ही लोकशाही पद्धतीने केलेली असावी. यासंदर्भात संस्थेच्या घटनेमध्ये आणि / किंवा संस्थापनामध्ये / संस्थापन नियमावलीमध्ये / नियमामध्ये / संस्थेच्या उपविधीमध्ये विशिष्ट व उचित तरतुदी असाव्यात.

४) संस्थेच्या कार्यरत पदाधिकाऱ्यांची नावे, पत्ते व दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक असलेली अचूक यादी, प्रस्तावासोबत सादर करावी.

५) संस्थेमार्फत अर्थसहाय्याची मागणी करण्यात आलेल्या उपक्रमांना जर शासनाकडून अनुदान मिळत असेल तर अशा संस्थेच्या उपक्रमांना "मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी" मधून अर्थसहाय्य अनुज्ञेय असणार नाही.

६) धर्मादाय संस्थांच्या परिपूर्ण प्रस्तावानुसार मागणी केलेल्या उपक्रमाच्या / उद्दिष्टाच्या संपूर्ण खर्चाच्या ५०% किंवा धर्मादाय निधी समितीची शिफारस विचारात घेऊन मा.मुख्यमंत्री यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल.

७) संस्थेचे मागील ५ वर्षांच्या लेखापरीक्षित लेख्यांच्या प्रती, त्याचबरोबर संस्थेचे लेखे अचूक असल्याबद्दल सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.

८) संस्थेच्या मागील पाच वर्षांच्या आयकर भरणा केल्याच्या (Income Tax Return) विवरणपत्रांच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे.

९) संस्थेचे मागील पाच वर्षाचे लेखापरीक्षा अहवाल व विवरणपत्र संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयामध्ये / धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये नियमितपणे सादर करण्यात आल्याबाबतचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.

१०) "संस्था नोंदणी अधिनियम १८६०" किंवा "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" अन्वये नोंदणीकृत संस्थेविरूद्ध गैरप्रकाराची कोणतीही तक्रार/दावा/अपील प्रलंबित नाही, याबाबतचे संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय/धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयातील संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.

११) संस्थेला मागील पाच वर्षामध्ये " मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी " कडून कोणतेही वित्तीय सहाय्य मिळाले नसल्याचे, संस्थेने तसे प्रमाणपत्र सादर करावे.

१२) मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी कडून किंवा अन्य कोणत्याही विश्वस्त व्यवस्थेकडून यापूर्वी, कोणतेही वित्तीय सहाय्य मिळालेले असेल तर, त्याबाबत विनियोगाचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant) प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) प्रस्तावासोबत सादर करावे. सनदी लेखापालाव्यतिरिक्त अन्य लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र शासनाकडून ग्राह्य धरले जाणार नाही

१३) नवीन इमारतीचे बांधकाम करण्याकरिता किंवा इमारतीचा विस्तार करण्याकरिता अथवा त्याचे नूतनीकरण करण्याकरिता वित्तीय सहाय्याची मागणी केली असेल त्या प्रकरणात, ज्या जमिनीवर प्रस्तावित इमारत / प्रकल्प उभारावयाचा आहे, त्या जमिनीचा मालकी हक्क दर्शविणारी कागदपत्रे, नोंदणीकृत वास्तुशास्त्रज्ञाकडून / स्थापत्य अभियंत्याकडून प्रमाणित केलेल्या प्रकल्पाचा आराखडा (Blue Print), प्रकल्प खर्चाचे अंदाजपत्रक, सक्षम प्राधिकाऱ्याकडून जमिनीचा अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याची परवानगी, बांधकाम करण्यासाठी परवानगी देणारे नियोजन प्राधिकरणाचे बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र इत्यादी प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे

१४) संस्थेच्या १०० टक्के विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांची एकूण संख्या, विद्यमान इमारती व एकूण वर्गखोल्या इत्यादी नमूद असलेला तसेच, शिक्षण हक्क कायद्यातील विहित निकषांनुसार शाळेस आवश्यक असणाऱ्या वर्ग खोल्या व इतर सोयी सुविधा व शिक्षणाचा दर्जा उच्च प्रतीचा असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तसेच अद्ययावत वार्षिक तपासणी अहवाल व शाळेच्या संच मान्यतेची प्रत प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या तसेच विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने संस्थेकडून राबविण्यात येणाऱ्या प्रस्तावित प्रकल्पास अर्थसहाय्य मंजूर करतांना प्राधान्य देण्यात येईल.

१५) संस्थेस आयकर अधिनियमाच्या कलम ८० जी अन्वये, कोणतीही सूट असल्यास, आयकरात सूट मिळाल्याचे प्रमाणपत्र तसेच सूट मिळाल्याचा कालावधी विनिर्दिष्ट करणारे प्रमाणपत्र संस्थेने सादर करावे

१६) बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, रद्द केलेला धनादेश व मागील पाच वर्षांचे संबंधीत बँक खात्यातील जमा व खर्चाचे अद्ययावत विवरणपत्र यासह संस्थेच्या बँक खात्याचा तपशील संस्थेने सादर करावा. (बँक विवरणपत्र जोडपत्र-ड)

१७) अनाथाश्रम / वृद्धाश्रम इ. यांना सुविधा पुरविण्यासंबंधात संस्थेचा प्रस्ताव असेल तर, संबंधित संस्थेचा दर्जा व कामगिरी यांच्या संबंधात सक्षम प्राधिका-याने दिलेला तपासणी अहवाल प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१८) धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत (परिशिष्ट-१), संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तांची नोंद असल्याची अद्ययावत साक्षांकित प्रत संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.

१९) संस्थेकडून ज्या उपक्रमासाठी अर्थसहाय्याची मागणी केली असेल त्या उपक्रमासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे, त्याबाबतचे अंदाजपत्रक / कोटेशन इ. संस्थेने सादर करणे आवश्यक आहे. सदर उपक्रमासाठी संस्था संस्थेच्या निधीतून किती खर्च करणार आहे. तसेच मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून किती अर्थसहाय्य अपेक्षित आहे. उर्वरित खर्चाची तरतूद संस्था कशा प्रकारे करणार आहे याचा सविस्तर तपशील संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.

२०) ज्या संस्थेला अर्थसहाय्य देण्यात येणार आहे, अशी संस्था रुग्णालय असेल तर रुग्णालयाला "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" च्या कलम ४१ अअ नुसार गरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा पुरवाव्या लागतील. संस्थेने तसे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२१) वित्तीय सहाय्य देण्यात आलेल्या संस्थांना एक वर्षाच्या आत खर्चाच्या तपशीलाचे विवरणपत्र, सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेल्या उपयोगिता प्रमाणपत्रासह कार्यपूर्ती अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे.

२२) मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून देणगी/सहाय्य मागणीकरिता, शासन निर्णयातील तरतूदीस अनुसरुन तसेच सोबत जोडलेल्या विवरणपत्र “क” व "ड" नुसार संपूर्ण कागदपत्रांसह माहिती सादर करणे आवश्यक आहे.

२३) संस्थेस “मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून मंजूर करण्यात येणारी रक्कम ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येणार आहे. त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर करण्यात येईल. वित्तीय सहाय्याचा गैरवापर केला किंवा कोणत्याही शर्तीचा भंग केला तर, वित्तीय सहाय्याची रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे १२ टक्के दंडात्मक व्याजासह तसेच वित्तीय सहाय्य वसूल करण्यासाठी झालेला कोणताही खर्च, संस्था किंवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावा”, असे बंधपत्र १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.

२४) संस्थेला देण्यात आलेल्या वित्तीय सहाय्याचा वापर एक वर्षामध्ये प्रस्तावित प्रकल्पाकरीता/ कामाकरीता करण्यात यावा, जर वितरित करण्यात आलेल्या रकमेचा वापर करण्यास कसूर केल्यास, संबंधित संस्थेस दोन महिन्यांची नोटिस देण्यात येईल. दोन महिन्यांची नोटिस देऊनही उपयोगिता प्रमाणपत्र संस्थेने सादर न केल्यास अशा संस्थांकडून देणगीची रक्कम १२ % एवढया दंडनीय व्याजासह संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल आणि वरील उपखंड (तेवीस) मधील सर्व तरतूदी, योग्य त्या फेरफारांसह, अशा प्रकरणांना लागू होतील.

(ड) “मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी” पुढील संस्थांना मदत देण्याकरिता असता कामा नये :-

१) निव्वळ धार्मिक किंवा जातीय स्वरुपाच्या संस्था किंवा संघटना किंवा सर्व जातीच्या व पंथाच्या व्यक्तींना, ज्यांच्याकडून लाभ घेता येत नाही, अशा संस्था किंवा संघटना,

२) निव्वळ राजकीय स्वरुपाच्या संस्था किंवा संघटना, किंवा संघटनांनी राजकीय प्रचारासाठी स्थापन केलेल्या, नियंत्रित किंवा पुरस्कृत केलेल्या संस्था किंवा संघटना.

३) संस्थेचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व विश्वस्त यांच्या निवडीची वा नियुक्तीची प्रक्रिया ही अनुवांशिक किंवा जन्माने उत्तराधिकारी अशी असेल, तर अशा संस्था / संघटना

४) धार्मिक बाबींशी निगडीत / संबधित उपक्रमांसाठी अर्थसहाय्याची मागणी केली असेल, तर अशा उपक्रमांसाठी अशा संस्था / संघटना

५) ज्या संस्था / संघटना / अथवा त्यांचे पदाधिकारी यांचे विरूद्ध नैतिक अध:पतन, संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहार इ. बेकायदेशीर हालचालीमध्ये गुंतलेले असल्याची तक्रार / दावा/ अपील प्रलंबित आहेत अशा संस्था/ संघटना. परंतु संस्थेचे पदाधिकारी यांचे विरूध्द वैयक्तिक अथवा खाजगी बाबींबाबत दाखल केलेली किरकोळ तक्रार / दावा / अपील वगळून, या तरतूदीच्या अनुषंगाने सक्षम पोलीस अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

४. मा. मुख्यमंत्री यांच्याकडून वरील संस्था/संघटनेला निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल आणि कोणतीही शंका किंवा विवाद अथवा अन्य वादग्रस्त प्रकरणांच्या बाबतीत, वित्तीय सहाय्याचे वितरण/ वितरण थांबविणे / ते देण्याचा पुनर्विचार या संबंधात, सदर शासन निर्णयास अनुसरुन मा. मुख्यमंत्री महोदय यांचा निर्णय अंतिम असेल.

५. संस्थेच्या प्रस्तावास मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून वित्तीय सहाय्य मंजूर झाल्यानंतर NEFT द्वारे संस्थेच्या बँक खात्यामध्ये रक्कम जमा करण्यात येईल.

६. मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीची मागणी क्र. ए-५, प्रधानशिर्ष २२५० इतर सामाजिक सेवा- १०१, धर्मादाय प्रयोजनासाठी देणग्या (००) (००) (०१) धर्मादाय प्रयोजनासाठीच्या निधीकरिता मुख्यमंत्र्याच्या देणग्या (२२५० ००१२) अनिवार्य -५०, इतर खर्च, या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेली रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेतील सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांच्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यामध्ये जमा करण्याकरिता, अवर सचिव (साप्रवि/का.२५) यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून तसेच उपसचिव/सहसचिव (साप्रवि/का.२५) यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. उपरोक्तप्रमाणे केलेली कार्यवाही, विवरणपत्र “अ” व “ब” नोंदवही, कॅशबुक व धनादेश नोंदवहीमध्ये नोंद करुन सदर नोंदी आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर नियंत्रण अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. या निधीतील खर्च महालेखापाल, मुंबई, महाराष्ट्र, यांच्याकडून लेखापरीक्षा करण्याच्या अधीन असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१७१३२१३८६२०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NAND KUMAR

Digitally signed by NAND KUMAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NAND KUMAR
Date: 2019.09.17 15:49:34 +05'30'

(नंद कुमार)
प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी,
महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२,
२. सर्व सन्माननीय संसद सदस्य,विधान परिषद/विधान सभा सदस्य, महाराष्ट्र राज्य,
३. मा.राज्यपालांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
५. मुख्यमंत्र्यांचे उप सचिव
६. मुख्य सचिवांचे उप सचिव
७. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. महालेखापाल-१,(लेखापरीक्षा) महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल-२,(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
१०. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई-१,
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१२. प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), विधानभवन, मुंबई-३२,
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), विधानभवन, मुंबई-३२,
१६. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२,
१७. सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२,
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय, (मुळ न्याय शाखा), मुंबई/औरंगाबाद/ नागपूर.
१९. प्रबंधक उच्च न्यायालय, (अपिल शाखा), मुंबई/ औरंगाबाद/ नागपूर.
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/ औरंगाबद/ नागपूर.
२१. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
२२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ मुंबई
२४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२ नागपूर
२५. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई
२६. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-४०० ०१८.
२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२८. त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन निर्णयास प्रसिध्दी देण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.
२९. सर्व मंत्रालयीन विभाग,
३०. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
३१. मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.
(त्यांनी सदर शासन निर्णय आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दी करिता लावावा)
३२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३३. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषदा
३४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३५. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
३६. राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
३७. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये.
३८. निवड नस्ती/कार्यासन २५, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी प्रशासनासंबंधीचे नियमाबाबत, सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक सीसीएफ-१०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५, दि. १७ सप्टेंबर, २०१९ मधील
नियम ३ (ब) ५) नुसार विवरणपत्र “अ” व विवरणपत्र “ब”

विवरणपत्र “ अ ”

अ.क्र.	अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष	संस्था/संघटनेचे नाव, अर्जदाराचे नाव व अर्ज सादर केल्याबाबतचा दिनांक	मंजूरी आदेश क्रमांक व दिनांक	मंजूर देणगीची/ अर्थसहाय्याची रक्कम	ज्या प्रस्तावासाठी/ प्रयोजनासाठी देणगी /अर्थसहाय्य मंजूर केले आहे, त्याची थोडक्यात माहिती	शेरा व नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी
१	२	३	४	५	६	७

विवरणपत्र “ ब ”

दिनांक	नमुना “अ” मधील नोंदवहीतील संदर्भ क्रमांक	संस्था/संघटनेचे नाव/ अर्जदाराचे नाव	मंजूर देणगीची/ अर्थसहाय्याची रक्कम व धनादेश क्रमांक व दिनांक	वितरीत करावयाची रक्कम	प्रत्यक्ष वितरीत रक्कम	निधीतील शिल्लक (रुपये)	शेरा व नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी
१	२	३	४	५	६	७	८

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी प्रशासनासंबंधीचे नियमबाबत शासन निर्णय क्रमांक सीसीएफ-१०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५,दि. १७ सप्टेंबर, २०१९ मधील सर्व अटी व शर्तीनुसार तसेच खालील विवरणपत्रातील माहितीसह, मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी मधून देणगी / अर्थसहाय्य मागणीकरिता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. [कागदपत्रांच्या छायांकित प्रती (झेरॉक्स प्रती)संस्थेच्या अध्यक्ष/सचिवांनी साक्षांकित करुन पाठविणे आवश्यक आहे.]

विवरणपत्र- "क"

अ.क्र.	संस्थेकडून मागविण्यात येणाऱ्या माहितीचे मुद्दे	
१.	संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता	
२.	अर्जदार धर्मादाय संस्था, "संस्था नोंदणी अधिनियम १८६०" किंवा "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. अर्थसहाय्य मागणी प्रस्तावासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.	
३.	अर्जदार धर्मादाय संस्थेला, "संस्था नोंदणी अधिनियम १८६०" किंवा "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" अन्वये नोंदणी केल्यानंतर पाच वर्षे पूर्ण झालेली असावीत आणि ती यथा योग्यरित्या कार्यरत असल्याबाबत संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.	
४.	सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने प्रमाणित केलेली घटनेची अद्ययावत प्रत व संस्थेची उद्दिष्टे संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.	
५.	संस्थेच्या कार्यरत पदाधिकाऱ्यांची नावे, पत्ते व दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक असलेली अचूक यादी, प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.	
६.	निव्वळ धार्मिक किंवा जातीय स्वरुपाच्या संस्था किंवा संघटना किंवा सर्व जातीच्या व पंथाच्या व्यक्तींना, ज्यांच्याकडून लाभ घेता येत नाही, अशा संस्था किंवा संघटना नसल्याचे संस्थेच्या अध्यक्ष किंवा सचिव यांचे प्रमाणपत्र जोडावे.	
७.	निव्वळ राजकीय स्वरुपाच्या संस्था किंवा संघटना, किंवा संघटनांनी राजकीय प्रचारासाठी स्थापन केलेल्या, नियंत्रित किंवा पुरस्कृत केलेल्या संस्था किंवा संघटना नसल्याचे संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव यांचे प्रमाणपत्र जोडावे.	
८.	ज्या संस्था / संघटना / अथवा त्यांचे पदाधिकारी यांचे विरूद्व नैतिक अध:पतन, संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहार इ. बेकायदेशीर हालचालीमध्ये गुंतलेले असल्याची तक्रार / दावा/ अपील प्रलंबित आहेत अशा संस्था/ संघटना. परंतु संस्थेचे पदाधिकारी यांचे विरूध्द वैयक्तिक अथवा खाजगी बाबींबाबत दाखल केलेली किरकोळ तक्रार / दावा / अपील वगळून, या तरतूदीच्या अनुषंगाने सक्षम पोलीस अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.	
९.	संस्थेचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व विश्वस्त यांच्या निवडीची वा नियुक्तीची प्रक्रिया ही अनुवंशिक किंवा जन्माने नसल्याचे प्रमाणपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.	

१०.	संस्थेचे मागील ५ वर्षांच्या लेखापरीक्षित लेख्यांच्या प्रती (Audit Report) त्याचबरोबर संस्थेचे लेखे अचूक असल्याबद्दल सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.	
११.	संस्थेने मागील सलग पाच वर्षांचे आयकर भरणा केल्याच्या (Income Tax Return) विवरणपत्रांच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे.	
१२.	संस्थेचे मागील पाच वर्षांचे लेखापरीक्षा अहवाल व विवरणपत्र संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयामध्ये / धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये नियमितपणे सादर करण्यात आल्याबाबतचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.	
१३.	"संस्था नोंदणी अधिनियम १८६०" किंवा "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" अन्वये नोंदणीकृत संस्थेविरूद्ध गैरप्रकाराची कोणतीही तक्रार/दावा/अपील प्रलंबित नाही, याबाबतचे संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय/धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.	
१४.	संस्थेला मागील पाच वर्षामध्ये " मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी" कडून कोणतेही वित्तीय सहाय्य मिळाले नसल्याचे, संस्थेने तसे प्रमाणपत्र सादर करावे.	
१५.	मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी कडून किंवा अन्य कोणत्याही विश्वस्त व्यवस्थेकडून यापूर्वी, कोणतेही वित्तीय सहाय्य मिळालेले असेल तर, त्याबाबत विनियोगाचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant) प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.	
१६.	संस्थेने नवीन इमारतीचे बांधकाम करण्याकरिता किंवा इमारतीचा विस्तार करण्याकरिता अथवा त्याचे नूतनीकरण करण्याकरिता वित्तीय सहाय्याची मागणी केली असेल त्या प्रकरणात, ज्या जमिनीवर प्रस्तावित इमारत / प्रकल्प उभारावयाचा आहे, त्या जमिनीचा मालकी हक्क दर्शविणारी कागदपत्रे, नोंदणीकृत वास्तुशास्त्रज्ञाकडून / स्थापत्य अभियंत्याकडून प्रमाणित केलेल्या प्रकल्पाचा आराखडा (Blue Print), प्रकल्प खर्चाचे अंदाजपत्रक, सक्षम प्राधिकाऱ्याकडून जमिनीचा अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याची परवानगी, बांधकाम करण्यासाठी परवानगी देणारे नियोजन प्राधिकरणाचे बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र इत्यादी प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.	
१७.	संस्थेच्या १०० टक्के विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांची एकूण संख्या, विद्यमान इमारती व एकूण वर्गखोल्या इत्यादी नमूद असलेला तसेच, शिक्षण हक्क कायद्यातील विहित निकषांनुसार शाळेस आवश्यक असणाऱ्या वर्ग खोल्या व इतर सोयी सुविधा व शिक्षणाचा दर्जा उच्च प्रतीचा असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तसेच शाळेचा अद्ययावत	

	वार्षिक तपासणी अहवाल व शाळेच्या संच मान्यतेची प्रत प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.	
१८.	संस्थेस आयकर अधिनियमाच्या कलम ८० जी अन्वये, कोणतीही सूट असल्यास, आयकरात सूट मिळाल्याचे प्रमाणपत्र तसेच सूट मिळाल्याचा कालावधी विनिर्दिष्ट करणारे प्रमाणपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.	
१९	बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, रद्द केलेला धनादेश व मागील पाच वर्षांचे संबंधीत बँक खात्यातील जमा व खर्चाचे अद्ययावत विवरणपत्र यासह संस्थेच्या बँक खात्याचा तपशील संस्थेने सादर करावा. (बँक विवरणपत्र जोडपत्र-ड)	
२०.	अनाथाश्रम / वृद्धाश्रम इ. यांना सुविधा पुरविण्यासंबंधात संस्थेचा प्रस्ताव असेल तर, संबंधित संस्थेचा दर्जा व कामगिरी यांच्या संबंधात सक्षम प्राधिका-याने दिलेला तपासणी अहवाल प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.	
२१.	धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत (परिशिष्ट-१), संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तांची नोंद असल्याची अद्ययावत साक्षांकित प्रत संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.	
२२.	संस्थेकडून ज्या उपक्रमासाठी अर्थसहाय्याची मागणी केली असेल त्या उपक्रमासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे, त्याबाबतचे अंदाजपत्रक / कोटेशन संस्थेने सादर करणे आवश्यक आहे. सदर उपक्रमासाठी संस्था संस्थेच्या निधीतून किती खर्च करणार आहे. तसेच मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून किती अर्थसहाय्य अपेक्षित आहे. उर्वरित खर्चाची तरतूद संस्था कशा प्रकारे करणार आहे याचा सविस्तर तपशील संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.	
२३.	ज्या संस्थेला सहाय्य देण्यात येणार आहे, अशी संस्था रुग्णालय असेल तर रुग्णालयाला "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" च्या कलम ४१ अअ नुसार गरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा पुरवाव्या लागतील. संस्थेने तसे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.	
२४.	संस्थेस "मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून मंजूर करण्यात येणारी रक्कम ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येणार आहे. त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर करण्यात येईल. वित्तीय सहाय्याचा गैरवापर केला किंवा कोणत्याही शर्तीचा भंग केला तर, वित्तीय सहाय्याची रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे १२ टक्के दंडात्मक व्याजासह तसेच वित्तीय सहाय्य वसूल करण्यासाठी झालेला कोणताही खर्च, संस्था किंवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावा", असे बंधपत्र १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक आहे.	

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी प्रशासनासंबंधीचे नियमाबाबत, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीएफ-१०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५, दि. १७ सप्टेंबर, २०१९ चे

जोडपत्र-ड

एन. ई. एफ. टी. द्वारे प्रदाने करण्यासाठीचा तपशील

(Details to be sumbitted for Fund Transfer by NEFT)

१.	मागणीदार संस्थेचे नाव Name of the Society	
२.	संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता Office address of the Society	
३.	बँक खाते क्रमांक Bank Account Number	
४	बँक खात्याचा प्रकार Type of Bank Account	
५.	बँकेचे नाव Name of the Bank	
६.	बँक शाखेचे नाव व पत्ता Name of the Branch & address	
७.	बँक शाखेचा संकेतांक (Branch Code)	
८	एमआयसीआर क्रमांक (MICR Number)	
९	आयएफसीआर क्रमांक (IFCR Number)	

दिनांक :

मागणीदाराची सही

बँकेचे प्रमाणपत्र (Bank Cerfiticate)

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासली असून ती योग्य आहे.

I certify that the above information is correct as par the record.

शाखा प्रमुख (Branch Head)
बँक शाखेचे नाव व शिक्का
(Branch Name & Seal)